MHSN030028112021

**म.सं.कौ.हिं.का. अर्ज क्र.१०१/२०२१**

**निशाणी क्र.५ खालील आदेश**

**(शाहीन शेख वगैरे विरुध्द नुरमहंमद शेख वगैरे)**

## आदेश

हा अर्ज कौंटुबिक हिंसाचार पासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ चे अंतरिम पोटगीसाठी, मनाई आदेशासाठी आणि संरक्षणात्मक आदेश होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. यातील अर्जदाराचे थोडक्यात कथन खालील प्रमाणे आहे. यातील अर्जदार क्र.१ व जाबदार नं.१ व २ यांचा मुलगा इरफान नुरमहंमद शेख याचेशी दि.१६.१२.२०११ रोजी भुई समाज, गणेश नगर, सांगली येथे मुस्लीम धर्म शास्त्रानुसार रीतीरिवाजानुसार झाला. अर्जदाराचे मते, विवाह झाल्यानंतर जाबदार याने काही दिवस तिला व्यवस्थित नांदवले. त्यानंतर ते तिला मानसिक व शारिरीक त्रास देवू लागले. अर्जदार क्र.१ हिचे पती इरफान यांचे दि.२०.०६.२०२१ रोजी निधन झाले. त्यानंतर जाबदार हे अर्जदार क्र.१ हिचे वादविवाद करुन तिच्या दोन मुली– रुकैय्या व इरम हे राहत असलेल्या मिळकतीतून व दुकान गाळा नं.१ या मिळकतीतून हुसकावून लावण्याचा प्रयत्न करुन तिला त्रास देवू लागले तसेच, तिच्याबरोबर वारंवार भांडणतंटा करुन तिचा मानसिक शारिरीक व आर्थिक त्रास करुन माहेरी जाण्यास प्रवृत्त करु लागले.

३. दि.०२.०७.२०२१ रोजी अर्जदार क्र.१ ही तिच्या मुलीसोबत माहेरी आल्यानंतर जाबदाराने तिच्या पालनपोषणाची कोणतीही तजवीज केलेली नाही. अर्जदारांच्या कथनानुसार, ती स्वतःचा व मुलींचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहे. याउलट जाबदार याची आर्थिक परिस्थिती चांगली आहे. जाबदार

क्र.१ यांचा ट्रान्सपोर्टचा व्यवसाय असून त्यांना दरमहा ३० ते ४० हजार रुपये मिळतात तसेच, कोल्हापूर येथील सि.स.नं.३००/ब या मिळकतीतील दुकान गाळ्याच्या भाड्यातून त्यांना दरमहा २५०००/– रुपये भाडे मिळते. जाबदार क्र.४ हे ड्रायव्हींगचे काम करत असून त्यांना दरमहा १० ते १५ हजार रुपये मिळते व जाबदार क्र.५ हे खाजगी नोकरीत असून त्यांना दरमहा २० ते २५ हजार रुपये तर जाबदार क्र.६ हे हे एजंट असून त्यांना दरमहा ४० ते ५० हजार रुपये मिळते. अशाप्रकारे जाबदार क्र.१ व ३ ते ६ यांना दरवर्षी सुमारे ४ ते ५ लाख रुपये उत्पन्न मिळते. वरील सर्व कथने करुन अर्जदार क्र.१ हिने तिचा झालेल्या मानसिक व शारिरीक त्रासामुळे प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

४. यातील जाबदार क्र.१ ते ६ हे या कामात हजर झाले आहेत व त्यांनी निशाणी ३० ला त्यांचे म्हणणे दिले आहे. त्यांनी अर्जदाराची सर्व कथने नाकारलेली आहेत. त्यांनी अर्जदार व जाबदार क्र.१ व २ यांचा मुलगा इरफान नुरमहंमद शेख यांचा दि.१६.१२.२०११ रोजीचा विवाह मान्य केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, जाबदार क्र.१ व २ हे वयोवृध्द असून जाबदार क्र.३ मिळेल ते काम करुन त्यांचा व त्यांच्या कुटूंबाचा काटकसरीने उदरविार्ह करतात. जाबदार क्र.४ हे व्यवसायाने ड्रायव्हर असून त्यांना दरमहा र.रु.१२,०००/– इतका पगार मिळतो व त्यातून त्यांची पत्नी व दोन मुली या सर्वांच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी त्यांच्यावर आहे. जाबदार क्र.५ हे दरमहा र.रु.५,०००/– यावर भाडेतत्वावर राहण्यास असून त्यांना दरमहा र.रु.११,०००/– इतका पगार असून त्याच्या कुटूंबाची उदरनिर्वाहाची जबाबदारी आहे. जाबदार क्र.६ यांचेदेखील दरमहा र.रु.१०,०००/– इतका पगार असून त्यांच्यावर कुटूंबाची जबाबदारी आहे.

५. जाबदारांच्या म्हणण्यानुसार त्यांना अर्जदार क्र.१ ते ३ यांना कोणत्याही प्रकारची पोटगी देणे अशक्य आहे. कोल्हापूर येथील मिळकत

सि.स.नं.३००/ब याबाबतीत देखील जाबदारांच्या म्हणण्यानुसार त्यांनी ती मिळकत जाबदार क्र.३ यांना दिलेली असल्यामुळे जाबदार क्र.१ यांच्या वारसाने म्हणजेच जाबदार क्र.२, ४ व ६ यांना सदर मिळकतीमध्ये कोणताही हक्क व हिस्सा प्राप्त होत नाही. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, अर्जदार व जाबदार हे मुस्लीम असल्याने मुस्लीम कायद्याप्रमाणे अर्जदार क्र.१ यांचे पती तिच्या सास–यांपूर्वी मयत झाले असल्याने तिला व अर्जदार क्र.२ व ३ यांना मुस्लीम कायद्याप्रमाणे कोणताही हक्क व हिस्सा प्राप्त होत नाही. त्यांच्या मते प्रस्तुत वाद विषय हा दिवाणी स्वरुपाचा असल्यामुळे प्रस्तुतचा अर्ज चालत नसतानादेखील अर्जदाराने दाखल केला आहे. अर्जदार जास्त शिक्षीत असून त्या लहान मुलांच्या शिकवण्या व शिवणकाम यातून तिला दरमहा र.रु.१५ ते २० हजार मिळतात. अशी कथन करत जाबदाराने अर्जदाराचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

६. अर्ज व जाबदाराचे म्हणण्याचे बारकाईने अवलोकन केले. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला. वरील सर्व कथनांचा विचार करता मी खालील मुद्दे व त्यांच्या निष्कर्षाप्रत आले आहे. सदर मुद्दे, त्यांचे निष्कर्ष व त्याची कारणमिमांसा याचा उहापोह मी खाली केलेला आहे.

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | अर्जदार क्र.१ ते ३ हे जाबदार क्र.१ ते ६ कडून कौटुंबिक हिंसाचार झाला, हे सिध्द करतात काय ? | होकारार्थी |
| **२.** | अर्जदार नं १ ते ३ हे मागणी केल्याप्रमाणे अर्जाचा निकाल लागेपर्यंत अंतरिम पोटगीस पात्र आहेत काय ? असल्यास रक्कम किती ? | अंशतः होकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| ३. | अर्जदार हे मागणी केल्याप्रमाणे तिच्या ताब्यात असलेले कोल्हापूर येथील सि.स.नं.३००/ब मधील पहिल्या मजल्यावरील दोन खोल्या व जमिन मजल्यावरील दुकान गाळा नं.१ व पुर्ण तळमजला या मिळकतींचा शांततामय मिळकतीचा कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये तसेच, मिळकतीतील सामानांची नासधुस करुन त्यांना मिळकतीतून बेदखल करु नये व मिळकतीची विल्हे विक्री तबदिली, अगर बोजा निर्माण करु नये या मनाई आदेशास पात्र आहे काय ? | नकारार्थी |
| ४. | अर्जदार क्र.१ ते ३ हे मागणी केल्याप्रमाणे संरक्षणात्मक आदेशास पात्र आहेत काय ? | होकारार्थी |
| ५. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमीमांसा

**मुद्दा क्र. १ करीता–**

७. इथे प्रथमत: हे पाहणे गरजेचे आहे की अर्जदार व जाबदार हे 'कौटुंबिक संबंध' व्याख्येत बसतात का ? प्रस्तुत प्रकरणात अर्जदार नं. १ हीचा विवाह जाबदार क्र.१ व २ यांचा मुलगा इरफान नुरमहंमद शेख याचेशी दि.१६.१२.२०११ रोजी भुई समाज हॉल गणेशनगर, सांगली येथे मुस्लीम धर्मशास्त्रानुसार व रितीरिवाजानुसार झाला आहे. सदर लग्नाबाबतचे कथन जाबदारांनी त्यांच्या नि.३० कडील म्हणण्यात मान्य केले असल्यामुळे भारतीय पुरावा कायदा कलम ५८ नुसार हे कथन शाबीत करण्याची गरज नाही.

अर्जदाराने तिच्या लग्नाचे कथन शाबीत करण्यासाठी नि.३ सोबत विवाहाचे प्रमाणपत्र जोडले आहे. तसेच, तिचे मयत पती यांचे आधारकार्ड अर्जदार क्र.१ व २ यांचे जन्म प्रमाणत्र व अर्जदार व जाबदार यांचे रेशनकार्ड ही कागदपत्रे दाखल केली आहे. अर्जदाराच्या कथनानुसार जाबदार क्र.१ व २ हे तिचे सासरे व सासु असून जाबदार क्र.४ व ६ हे दीर आहेत. जाबदार क्र.३ हे सख्खे चुलत सासरे आहेत.

८. वरील सर्व कागदपत्रे व अर्जदार व जाबदार यांच्या लग्नाबाबतच्या कथनांचा विचार करता अर्जदार व जाबदार हे कुटूंबाच्या व्याख्येत येतात.

९. अशाप्रकारे, अर्जदार व जाबदार यांचेमधील कौटुंबिक संबंध शाबित झाल्यावर हा प्रश्न उभा राहतो की अर्जदार नं. १,२,३ यांचेवर जाबदार यांचेकडून कौटुंबिक हिंसाचार झाला आहे का ? या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी अर्जदाराच्या अर्जातील तक्रारीवजा नमुद केलेल्या काही घटनांचा विचार करणे गरजचे आहे. अर्जदाराने नमुद केलेल्या घटनांचे बारकाईने अवलोकन केल्यावर असे लक्षात येते की, यातील अर्जदार यांच्यावर जाबदार यांचेकडून कौटुंबिक हिंसाचार झालेला आहे. प्रस्तुत अर्जाच्या या टप्यावर प्रथमदर्शनी फक्त कौटुंबिक हिंसाचार झाला आहे. का, हे पाहणे गरजेचे आहे. त्यासाठी या टप्यावर अर्जदाराची जाबदारविरूध्दची तक्रारवजा कथने पुरेशी आहेत. आत्ता त्यासाठी पुराव्याचा विचार करणे या टप्यावर अपेक्षित नाही.

१०. वरील सर्व चर्चेचे बारकाईने अवलोकन केल्यानंतर असे म्हणता येते की, जाबदार यांचेकडून अर्जदार क्र.१ ते ३ यांचेवर कौंटुबिक हिंसाचार झालेला आहे. अशा प्रकारे मुद्दा क्रमांक १ च्या बाबतीत मी होकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

## मुद्दा क्र.२ करिता–

११. वरील सर्व चर्चेचे बारकाईने अवलोकन केले. हे सर्व अवलोकन केले असता असे समजते की सदर प्रकरणात प्रथमदर्शनी अर्जदारावर कौंटुबिक हिंसाचार झाला आहे. अर्जदारांच्या तक्रारीतील खोलीचा विचार हा जरी पुराव्याचा मुद्दा असला तरी प्रथमदर्शनी अर्जदारांच्या तक्रारींवरून केसमध्ये कौंटुबिक हिंसाचार झाला आहे, असे म्हणता येईल. तसेच अर्जदाराने तिला व अर्जदार नं.२ व ३ यांना जाबदारांकडून मानसिक, शारिरीक व आर्थिक त्रास होत असल्याबाबत हे सर्व विशेषरीत्या नमुद केले आहे.

१२. अर्जदार हिचे पती इरफान नुरमहंमद शेख हे दि.२०.०६.२०२१ रोजी मयत झाले आहे. अर्जदाराने तिचे संपत्ती व उत्तरदायित्वाचे शपथपत्र नि.१३ कडे दाखल केले आहे. तिने त्यामध्ये तिचा मासिक खर्च र.रु.१५,०००/– असल्याचे सांगून पाल्याचे देखभालीचा खर्च र.रु.१५,०००/– + र.रु.१०,०००/– असा नमुद केला आहे. सदर शपथपत्रामध्ये तिने जाबदारांचे स्थावर व इतर स्त्रोतामधून मिळणारे उत्पन्न नमुद केले आहे. परंतु, या प्रकरणात त्याबाबतची कोणतीही कागदपत्रे अर्जदाराने जोडली नाही.

१३. जाबदारांनी नि.२६ सह काही कागदपत्रे जोडली आहेत. सदर कागदपत्रांची बारकाईने अवलोकन केले असता जाबदारांनी त्यांच्यातील काही जणांचे पगारपत्रक तसेच, वैद्यकीय प्रमाणपत्र सोबत सादर केले आहे. अर्जदाराने नि.२२ सोबत जोडलेल्या कागदपत्रांमध्ये अर्जदारांची आधारकार्डांची प्रत, रेशकार्डाची प्रत तसेच, त्यांचे पती इरफान यांचा मृत्यूचा दाखला अर्जदार क्र.२ व ३ यांची बँक पासबुक प्रत अशी कागदपत्रे जोडली आहेत.

१४. प्रस्तुत प्रकरणात जाबदारांनी नि.२९ कडे मा.ना.मध्यप्रदेश उच्च न्यायालयाचा **बशीर खान वि. ईश्रत बानो, क्रिमीनल रिव्हीजन नं.४५८/२०२२** ची केस लॉ सादर केली आहे. सदर केस लॉ चे अवलोकन केले असता त्यामध्ये म.सं.कौ.हिं. कायदा २००५ मधील कलम ३६ बाबत उहापोह केला आहे. त्यानुसार, 'Section 36 of PWDVA Act provides that the provisions of that act shall be in addition to and not interrogation of the provisions of any other law for the time being in force.... '

१५. तसेच, जाबदाराने मा.मुंबई उच्च न्यायालयाचा **महंमद अब्दुल अजीज हिदायत वि. खैरुनिस्सा अब्दुलगणी, 1950 AIR (Bom.) 245** या केस लॉ सादर केले आहे. सदर केस लॉ चे बारकाईने अवलोकन केले. प्रस्तुत प्रकरणाचा विचार करता अर्जदार हिचे पती इरफान नुरमहंमद शेख हे दि.२०.०६.२०२१ रोजी मयत झालेले आहेत. तिच्यावर तिच्या दोन मुली रुकैय्या, व.व.७ व इरम व.व.३, अर्जदार क्र.२ व ३ यांची जबाबदारी आहे. सदर प्रकरणातील वर नमुद सर्व परिस्थितीचा अर्जदारांना त्यांच्या उदरनिर्वाहासाठी काहीतरी तरतुद होणे हे कायदेशिरदृष्ट्या व नैतिकदृष्ट्या अभिप्रेत आहे. प्रस्तुत प्रकरणातील वर नमुद चर्चेचे अवलोकन केले असता मी या मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष अंशतः होकारार्थी नोंदवत आहे.

**मुद्दा क्र. ३ करीता–**

१६. प्रस्तुत प्रकरणात अर्जदाराने तिच्या ताब्यात असलेले कोल्हापूर येथील सि.स.नं.३००/ब मधील पहिल्या मजल्यावरील दोन खोल्या व जमिन मजल्यावरील दुकान गाळा नं.१ व पुर्ण तळमजला या मिळकतींचा शांततामय मिळकतीचा कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये तसेच, मिळकतीतील सामानांची नासधुस करुन त्यांना मिळकतीतून बेदखल करु नये व मिळकतीची विल्हे विक्री तबदिली, अगर बोजा निर्माण करु नये अशा मनाई आदेशाची विनंती केली आहे. परंतु या प्रकरणात जाबदारांचे म्हणणे व त्यांचे सन्माननीय वकीलांचा

युक्तीवाद ऐकला असता सदर मिळकत जाबदार क्र.१ ने जाबदार क्र.३ यास दिलेली असल्याचे म्हटले आहे. जाबदारांचे कथन व सन्माननीय वकीलांचा युक्तीवाद पाहता या मुद्दयाचे निष्कर्षाप्रत येण्यासाठी सविस्तर पुराव्याची गरज आहे. सदर मुद्दा या टप्प्यावर कोणताही निष्कर्ष काढता येणार नाही. त्यामुळे मी या टप्प्यावर मुद्दा क्र.३ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. ४ करीता–**

१७. अर्जदार क्र.१ हिने प्रस्तुत प्रकरणात जाबदारांनी तिला कुठलाही कौटूंबिक – मानसिक अथवा शारिरीक त्रास देवून नये याकरीता संरक्षणात्मक आदेशाची मागणी केली आहे. प्रस्तुत प्रकरणात मी मुद्दा क्र.१ मध्ये जाबदारांनी अर्जदार नं.१ हिचा कौटूंबिक छळ झाला असल्याचे कारणमीमांसह स्पष्ट केले आहे. अशा परिस्थितीत, अर्जदारांना सदर छळापासून संरक्षण मिळणे हे प्रस्तुत कौंटुबिक हिंसाचार पासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ चा उद्देश पाहता आवश्यक आहे. म्हणून मी या मुद्दयाचे त्या अनुषंगाने निष्कर्ष होकारार्थी नोंदवत आहे.

**मुद्दा क्र. ५ करीता–**

१८. वरील सर्व चर्चेचे बारकाईने अवलोकन केल्यानंतर त्या अनुषंगाने कायद्याच्या तरतुदी पाहणे गरजेचे आहे. कौंटुबिक हिंसाचार पासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ चे कलम 2(q) अनुसार 'respondent' या शब्दाची व्याख्या खालीलप्रमाणे केली आहे.

Section 2(q) in The Protection of Women from Domestic Violence Act, 2005 :-

*2(q) "respondent" means any adult male person who is, or has been, in a domestic relationship with the aggrieved person and against whom the aggrieved person has sought any relief under this Act: Provided that an aggrieved wife or female living in a relationship in the nature of a marriage may also file a complaint against a relative of the husband or the male partner.*

१९. आता वरील व्याख्येचे बारकाईने अवलोकन केले असता असे लक्षात येते की, या कायद्याच्या तरतुदीनुसार 'respondent' या व्याख्येत 'any male person' असे स्पष्टपणे म्हटले आहे. तरी तरतुदीतील वर नमुद शब्दांचा विचार करता इथे 'respondent' हे male person आहेत. त्यामुळे, प्रस्तुत कामात अर्जदाराचे पती जिवंत नसताना यातील फक्त 'male person' कडुन पोटगीसाठी आदेश होणे योग्य आहे. प्रस्तुत प्रकरणात जाबदार क्र.२ ही कै.इरफान नुरमहंमद शेख याची आई आहे तर जाबदार क्र.३ हे जाबदार क्र.१ यांचे सख्खे बंधु आहेत. ते निव्वळ घरचे कुटूंब सदस्य आहे म्हणून त्यांच्यावर अर्जदारांच्या पालनपोषणाची जबाबदारी टाकणे योग्य होणार नाही.

२०. अशा प्रकारे वरील सर्व बाबींचा ऊहापोह केल्यानंतर मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. जाबदार क्र.१ ते ६ यांना असे निर्देशित करण्यात येते की, त्यांनी अर्जदार क्र.१ ते ३ यांना कुठल्याही मानसिक, शारिरीक अथवा शाब्दीक स्वरुपात त्रास देवू नये.

३. जाबदार क्र.१, ४ ते ६ यांनी एकत्रितपणे अर्जदार क्र.१ हिला दरमहा रक्कम रु.२,०००/-(र.रु.दोन हजार मात्र), अर्जदार क्र.२ ला दरमहा रक्कम रु.१०००/-(र.रु.एक हजार मात्र) आणि अर्जदार क्र.३ ला दरमहा रक्कम रु.१०००/-(र.रु.एक हजार मात्र) अंतरिम पोटगी म्हणून प्रस्तुतचा अर्ज दाखल तारखेपासून ते मुळ अर्जाचा अंतिम निकाल लागेपर्यंत द्यावेत.

४. हा आदेश मुळ अर्जाच्या अंतिम निकालापर्यंत अथवा पुढील आदेशापर्यंत लागु राहिल.

५. अर्जाचा खर्च मुळ अर्जासोबत.

६. या आदेशाची प्रत दोन्ही पक्षांना मोफत दिली जावी.

७. या आदेशाची प्रत संबधित पोलीस स्टेशन अधिका–याला, संरक्षण अधिका–याला व सर्व्हीस प्रोव्हायडर यांना कौंटुबिक हिंसाचार कायदयाच्या कलम २४ अंतर्गत पाठविण्यात यावी

**आदेश खुल्या न्यायालयात घोषित केला.**

JOSHI SNEHAL RAJAN Digitally signed by JOSHI SNEHAL RAJAN Date: 2024.12.12 15:19:30 +0530

**सांगली (स्नेहल राजन जोशी)**

**दिनांक :– ०६.१२.२०२४ ५वे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, सांगली**

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Sou.G.A. Patil (Grade-3) |
| Court | : | Snehal R. Joshi, 5th Jt.C.J.J.D. & J.M.F.C., Sangli. |
| Date | : | 06.12.2024 |
| Order signed by the Presiding officer on | : | 12.12.2024 |
| Order uploaded on | : | 12.12.2024 |